**राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत (RKVY) परंपरागत कृषि विकास योजना (PKVY) सन २०२६-२७ मध्ये राबविण्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गाचा पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कृवपदुम-१२०२७/५५/२०२६-MAG-१A**
**संगणक क्रमांक : १६५९१६३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०००३२
दिनांक : २२ मे, २०२६.

**वाचा:-**

१) केंद्र शासनाने www.agricoops.nic.in या सांकेतिक स्थळावर निर्गमित केलेल्या राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY) परंपरागत कृषि विकास योजना (PKVY) बाबतच्या मार्गदर्शक सूचना.
२) राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समीतीच्या इतिवृत्ताचे पत्र क्र. सीएसए-२०२६/प्र.क्र.१९/कार्यासन-२अे, दिनांक ११.०३.२०२६.
३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६
४) सामाजिक न्याय व विशेष सहायता विभाग शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि.१९.०५.२०२६
५) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.कृवपदुम-१२०२७/४५/२०२६-MAG-१A, दिनांक ०५.०५.२०२६ (प्रशासकीय मान्यता)
६) अवर सचिव (राकृवियो), कृषि व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०२६- RKVY-२११, दिनांक २७.०४.२०२६ (मदर सॅक्शन).
७) संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय यांचे जाक्र.कृआ/पीकेव्हीवाय/अनु.जमाती/नि.मा/ प्रथम हप्ता/२६७-र/२०२६, दि.०५.०५.२०२६ रोजीचे पत्र. (अनुसूचित जाती प्रवर्गासाठी निधी मागणी)
८) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.कृवपदुम-१२०२७/५५/२०२६-MAG-१A (E-१६५९१६३), दिनांक १८.०५.२०२६

**प्रस्तावना :-**

सन २०१६-१७ पासून राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत परंपरागत कृषि विकास योजना ही गट शेती आधारीत सेंद्रिय शेती योजना केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% याप्रमाणात राज्यात राबविण्यात येत आहे. सन २०२३-२४ पासून सदर योजना राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत राबविण्यात येत आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत परंपरागत कृषि विकास योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी वाचा क्र.०५ वरील शासन निर्णयान्वये रु. १७६६.०० लक्ष (सन २०२६-२७) वार्षिक कृति आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये राबविण्यासाठी पहिल्या हप्त्यापोटी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी केंद्र हिश्शाचा रू.५५,००,०००/- (रूपये पंचावन्न लक्ष फक्त) निधी केंद्र शासनाने संदर्भ क्र. ६ येथील पत्रान्वये उपलब्ध करून दिला आहे. त्यानुषंगाने निधी वितरीत करण्याबाबतचा कृषि आयुक्तालयाचा प्रस्ताव वाचा क्र. ७

अन्वये प्राप्त झाला आहे. परंपरागत कृषि विकास योजनेंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गाचा व अनुसूचित जमाती प्रवार्गाचा पहिल्या हप्त्याचा निधी वाचा क्र.८ अन्वये वितरीत करण्यात आला आहे. अनुसूचित जाती प्रवर्गाचा केंद्र हिश्श्याचा निधी रू.५५,००,०००/- (रुपये पंचावन्न लक्ष फक्त) व त्यास समरुप राज्य हिश्याचा निधी रु.३६,६६,६६७/- (रुपये छत्तीस लक्ष सहासष्ट हजार सहाशे सदुसष्ट फक्त) असा एकूण रु.९१,६६,६६७/- (रुपये एक्क्यान्नव लक्ष सहासष्ट हजार सहाशे सदुसष्ट फक्त) निधी कृषि आयुक्तालयास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत परंपरागत कृषि विकास योजना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गाचा केंद्र हिस्सा रू. ५५,००,०००/- (रुपये पंचावन्न लक्ष फक्त) व त्यास समरुप राज्य हिश्याचा निधी रु. ३६,६६,६६७/- (रुपये छत्तीस लक्ष सहासष्ट हजार सहाशे सदुसष्ट फक्त) असा पहिल्या हप्त्याचा एकूण रु. ९१,६६,६६७/- (रुपये एक्क्यान्नव लक्ष सहासष्ट हजार सहाशे सदुसष्ट फक्त) इतका निधी कृषी आयुक्तालयास वितरीत करण्यात येत आहे.

२. सदर निधी प्रदान केलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार खर्च करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. या प्रित्यर्थ होणारा खर्च मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येऊन पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

| | **केंद्र हिस्सा ( ६० %)** | **राज्य हिस्सा (४०%)** |
|---|---|---|
| **अनुसूचित जाती** | मागणी क्रमांक- एन-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>(००)७८९,अनुसूचित जाती उपयोजना<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१)(१३) कृषि उन्नती योजना-परंपरागत कृषि विकास योजना केंपुयो<br>(केंद्र हिस्सा ६० %)<br>२४०१ बी २०३,<br>योजनांतर्गत ३३ अर्थसहाय्य. | मागणी क्रमांक- एन-३<br>२४०१ पीक संवर्धन,<br>(००)७८९,अनुसूचित जाती उपयोजना<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१)(१४) कृषि उन्नती योजना- परंपरागत कृषि विकास योजना केंपुयो<br>राज्य हिस्सा ४० %)<br>२४०१ बी २१२,<br>योजनांतर्गत ३३ अर्थसहाय्य. |

३. सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे-

१) सदर योजना केंद्र शासनाच्या संदर्भाधिन मार्गदर्शक सुचनानुसार व केंद्र शासनाच्या निधी वितरीत करण्याच्या अटी व शर्ती नुसार राबविण्यात यावी.

२) खर्चाचे लेखे सुव्यवस्थित ठेवून सदर खर्चाचे लेखा परिक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र व राज्य शासनाला लवकरात लवकर प्रगती अहवालासह सादर करण्यात यावेत. योजनेच्या वेगवेगळ्या बाबींवरील भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल केंद्र व राज्य शासनास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करण्यात यावा.

३) योजनेशी संबंधित ताळेबंद व लेखापरिक्षण जमा खर्चाच्या रकमा यांचा अहवाल अंमलबजावणी यंत्रणेने द्यावा. त्यामध्ये वर्षाच्या सुरूवातीला अखर्चीत रकमा व व्याजाद्वारे मिळालेले उत्पन्न स्पष्टपणे नमूद करण्यात यावे. जेणेकरून पारदर्शी स्वरूपात रकमा विचारात घेता येतील व संदिग्धता राहणार नाही.

४) कोणत्याही परिस्थितीत मंजूर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

५) सदर निधी खर्च करताना विहित कार्यपद्धती अनुसरून सर्व वित्तीय कायदे/टेंडर नियमावली व नियमांचे/प्रक्रियेचे/वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत/P.W.D / मॅन्युअलचे अधिन राहून/ C.V.C.तत्वानुसार/ CAG च्या निर्देशानुसार/प्रचलित शासन निर्णय/नियम/परिपत्रक/ तरतुदी नुसार, बजेट व कोषागार नियमावली नुसार खर्च करण्याची कार्यवाही अमंलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहील.

६) वेळोवेळी शासन निर्णयान्वये वितरीत केलेला सर्व निधी SNA SPARSH प्रणालीव्दारे वितरीत करण्याची कार्यपध्दती बंधनकारक राहील.

७) संदर्भाधीन क्र. ६ येथील केंद्र शासनाच्या पत्रात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

८) वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ३ येथील परिपत्रकातील अटींचे पालन करण्यात यावे. तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र. ९ येथे नमूद बाबींची पूर्तता करण्यात यावी.

४. सदर योजनेकरीता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून व त्यांच्या कार्यालयातील सहायक संचालक, लेखा यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर निधी खर्च करतांना विहित कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे/ टेंडर नियामावली व नियमांचे/प्रक्रियेचे/वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत/P.W.D. मॅन्यूअलच्या अधिन राहून/C.V.C.तत्वानूसार/CAG च्या निर्देशानुसार/प्रचलित शासन निर्णय/नियम/परिपत्रक/ तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन निर्णय/अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहिल.

६. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि.१९.०५.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०५२२११२२५०३६०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS
MADHUSUDAN
SAKPAL

Digitally signed by SUHAS MADHUSUDAN SAKPAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=01592dd98f36fbc924826517361a31b8166fce7745d35b95fa79159b8fb74478, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=82434617B1F4C6035B3CC29788B8D394A52FB3EDABFC26B4E85EBC2AF7C45FF9, cn=SUHAS MADHUSUDAN SAKPAL
Date: 2026.05.22 11:23:50 +05'30'

**( सुहास सकपाळ )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति :**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
४. मा. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर .
८. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
१०. सर्व प्रकल्प संचालक, आत्मा.
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१२. सहाय्यक संचालक, लेखा -१, कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. कार्यासन १४३१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती (कार्यासन १-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.